**अर्जदारचे सा. क्र. १ यांचा उलटतपास जाबदेणारतर्फे वकील ॲड श्री. एम. टी. शितोळे यांचे मार्फत शपथेवर सुरु.**

**१०.** माझे शिक्षण ८ वी इयत्ता झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की मौजे पेडगाव, ता. दौंड, जि. पुणे येथे विवाह म्हणजे जाब देणार यांचे दारात झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की लग्नाचा खर्च जाबदेणार यांनी केला. जाबदेणार यांची अपेक्षा त्यांचे दारात लग्न होण्याची असल्याने त्यांचे दारात लग्न केले. हे म्हणणे खरे नाही की लग्न झाल्यानंतर १५ ते २० दिवस मी जाबदेणार यांचे घरी व्यवस्थित नांदले. हे म्हणणे खरे आहे की माझे लग्नाचे वेळेस जाबदेणार व त्यांचे कुटुंब एकत्र राहत होते. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे आपण वेगळे राहू असे मी जाबदेणार यांना म्हणत असे. हे म्हणणे खरे नाही की जाबदेणार हे वेगळे राहण्यास तयार नसल्याने मी वारंवार भांडण तंटा, आदळा आपट आणि शिवीगाळ करीत असे. हे म्हणणे खरे आहे की जा. दे. क्र. १ यांचे उजव्या हाताला बोटे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे जा. दे. क्र. १ याला टोचून बोलत असत. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी जा. दे. क्र. २ ते ४ यांचेशी देखील भांडण तंटा करीत असे.

प्रश्न — तुम्हांला जा. दे. क्र. १ यास नांदायला नेण्याची इच्छा आहे परंतु तुमची नांदायला जाण्याची इच्छा आहे का?

उत्तर — नाही.

**११.** हे म्हणणे खरे नाही की म्हणजेच मला जा. दे. क्र. १ याचेशी संसार करायचा नाही. हे म्हणणे खरे नाही की मी दुस—यावेळेस गर्भवती असताना जा. दे. क्र. १ यांना न सांगता माहेरी निघून गेले. हे म्हणणे खरे आहे की दि. ०३/०४/२०१३ रोजी मला दुसरे अपत्य झाले. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस मला जा. क्र. २ ते ४ भेटण्यास आले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस माझे माहेरचे लोक त्यांचेशी बोलले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस जा. दे. क्र. १ यांचे भाउ यांनी असे सांगितले की तुम्ही विभक्त रहा.

हे म्हणणे खरे नाही की तरीदेखील मी नांदावयास आले नाही.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की माझा व माझे मुलांचा सर्व खर्च जाबदेणार यांनी केला. हे म्हणणे खरे नाही की जाब देणार क्र. १ ते ५ यांनी मला कसालाही शारिरीक, मानसिक त्रास दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की पेडगाव हे खेडे गाव असल्याने मला त्याठिकाणी राहू न वाटल्याने मी माहेरी निघून आले. हे म्हणणे खरे नाही की मी माहेरी राहत असल्यापासून शिवणकाम, दुग्ध व्यवसाय व शेळी पालन करते.

**१३.** माझे वडीलांना अडीच एकर शेती आहे. मी त्याचा सातबारा उतारा अभिलेखावर दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की मी माझे वडीलांचे शेतामध्ये काम करते व त्यापासून उत्पन्न घेते व स्वताची उपजिवीका करते.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की जा. दे. क्र. १ याने मा. बारामती येथील न्यायालयात विवाह अर्ज क्र. १४७/२०२१ दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की सदर अर्जामध्ये तडजोड होवून विभक्त राहण्याचे अटीवर मी सासरी नांदावयास गेले होते. हे म्हणणे खरे नाही की माझे पतीला पावणेतीन एकर शेत आणि बंगला वाटून दिला व त्याठिकाणी आम्ही राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की मी सहा दिवसांत परत आले. हे मला माहित नाही की आमची शिधापत्रिका सन २०१८ पासून वेगळी आहे. हे म्हणणे खरे नाही की मी नांदत असताना शिधावाटप केंद्रातुन शिधा आणला होता.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की माझे वडीलांनी लग्नामध्ये २ ते ३ लाख रूपये खर्च केला हे मी खोटे सांगत आहे. लग्नामध्ये झालेल्या खर्चाचा लेखी पुराव्याबाबत मला घरच्यांना विचारावे लागेल. हे म्हणणे खरे नाही की मला दोन तोळे सोने केले हे मी खोटे सांगत आहे. मला सोन्याची पावती आहे किंवा कसे हे बघावे लागेल. हे म्हणणे खरे नाही की जा. दे. यांनी मला २ ते अडीच वर्षे नीट नांदविले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मला मुल होत नाही म्हणून जा. दे. क्र. १ ते ४ यांनी छळ केला हे मी खोटे सांगत आहे. मी लग्नाच्या सुरूवातीच्या दोन — अडीच वर्षात पोलिस ठाण्यात या

जाबदेणार यांचे विरूध्द तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की जाबदेणार हे मला उपाशी ठेवत होते, मला मारहाण करीत होते तसेच माझे चारित्रयावर संशय घेत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की हुंडयाचे पैसे राहिले म्हणून तसेच २ लाख रूपये व्यवसायासाठी घेवून ये म्हणून माझा छळ केला हे मी खोटे सांगत आहे.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की मी पोलिस ठाण्यात खोटया तक्रारी दाखल केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की माझे सर तपासातील संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की जाबदेणार क्र. १ यांना १२ एकर शेती असून १० ते ११ लाख रूपये उत्पन्न मिळते तसेच दुग्ध व्यवसायातुन ५० ते ६० हजार रूपये उत्पन्न मिळते हे मी खोटे सांगत आहे. जा. दे. क्र. १ यांचे नावावर १२ एकर क्षेत्र नसून सर्वांचे नावावर क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की नाही की मला जा. दे. क्र. १ यांचे सोबत नांदावयाचे नाही म्हणून मी त्यांचे विरूध्द खोटया केसेस दाखल केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की जा. दे. क्र. १ व मी आणि जा. दे. क्र. २ ते ५ वेगवेगळे राहतात. हे म्हणणे खरे नाही की जा. दे. क्र. १ यांची मला पोटगी देण्याची ऐपत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

(जे. एन. भस्मे)

दिनांक २५/०७/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापुर.